संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# राफेलच्या गोपनीयतेचे तीन तेरा

**देशाच्या** सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही संवेदनशीलच आहे. एकीकडे पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यातून या राष्ट्रीय सुरक्षिततेचा मुद्दा पुढे आला होता. कारण सर्व प्रकारची दक्षता घेऊनही सीमा सुरक्षा दलाच्या ताफ्यावर आत्मघातकी हल्ला कसा होऊ शकतो. या हल्ल्याला प्रत्युत्तर देऊन देश सुरक्षिततेला किती प्रचंड महत्त्व देतो. हे सिध्द करण्याचा प्रयत्न झाला. लोकांना याबद्दल थोडाफार दिलासा मिळत असतानाच संरक्षण मंत्रालयाच्या कस्टडीत असलेले राफेल विमान खरेदी व्यवहारासंबंधातल्या काही महत्त्वाच्या कागदपत्रांची चोरी झाल्याची कबुली केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिली आहे. तर अशाच राष्ट्रीय सुरक्षिततेचे महत्त्व लक्षात घेऊन सोशल मीडियाचा गैरवापर थांबवण्याच्यादृष्टीने संसदीय समितीने काही नवीन नियमही तयार केले आहेत. सारांशरुपाने राष्ट्रीय सुरक्षितता हा मुद्दा सध्या चांगलाच ऐरणीवर आलेला आहे. परंतु शत्रू पक्षाचा प्रत्येक डाव आता उधळून लावण्याचा विडा भारतीय सैन्याने उचललेला आहे. सैनिक आपल्या जीवाची बाजी लावत आहे. परंतु या सगळ्या सुरक्षिततेची सर्वाधिक जबाबदारी ज्या संरक्षण मंत्रालयाकडे असते. त्या मंत्रालयाच्या मुख्यालयातूनच राफेल विमान खरेदी व्यवहारातले महत्वाचे कागदपत्र चोरले जावेत. ही अतिशय गंभीर बाब ठरते. ही कागदपत्रे चोरणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला गेला आहे. परंतु ज्या राफेल करारासंबंधीची गोपनियता प्रचंड प्रमाणात पाळली गेली. हा करार दोन देशांमधला असल्याने आणि शत्रू पक्षाला करारातील कोणतीही गोष्ट कळू नये. असा उद्देश लक्षात घेऊन या कराराची गोपनियता अतिमहत्वाची मानली गेली. म्हणजे राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंधित राफेल कराराची गोपनीयता पाळली जात असताना दुसरीकडे त्या कराराशी संबंधित महत्त्वाच्या कागदपत्रांची चोरी होत असेल तर कोणती गोपनीयता आणि कोणती सुरक्षितता असा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. यातला गंभीर भाग असा की संरक्षण मंत्रालय हे संरक्षण मंत्रालयाच्या सुरक्षिततेची सर्वाधिक काळजी घेतली जात असताना तिथूनच ही कागदपत्रे चोरीला जातात. ही काही साधारण गोष्ट ठरत नाही. आता ही कागदपत्रे कोणी चोरली, कशी चोरली, कोणासाठी चोरली आणि कधी चोरली गेली. या सगळ्या प्रश्नांची उत्तरे फार महत्वाची ठरतात.

### सुरक्षिततेचा मुद्दा

त्यातला महत्त्वाचा भाग असाही आहे की सरकारतर्फे महाअधिवक्त्यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयात पहिल्यांदाच ही सनसनाटी कबुली दिली गेली आहे. याचा अर्थ कागदपत्रांची चोरी होऊन बराच काळ झाला असावा. परंतु सरकारतर्फे ही बाब उघड केली गेली नाही आणि मग आता सर्वोच्च न्यायालयात राफेल प्रकरणाची सुनावणी सुरु असताना हा खुलासा केला गेला आहे. स्वाभाविकपणे याबाबतचा संशय आणखीनच बळावत जातो. कागदपत्रांच्या चोरीचा हा विषय सरकारने एवढे दिवस का दडवून ठेवला. त्यामागे नेमका हेतू काय होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नेमकी कोणती कागदपत्रे चोरीला गेली आहेत. त्याचा राफेल कराराशी कोणता थेट संबंध येतो. हेदेखील स्पष्ट झाले पाहिजे. या करारातला महत्त्वाचा भाग कोणाच्याही लक्षात येऊ नये म्हणून जी गोपनीयता पाळली गेली. त्या गोपनीयतेलाच या चोरी प्रकरणाने धक्का दिला आहे. अगदी सर्वोच्च न्यायालयातल्या सुनावणीच्याकाळात न्यायालयाला काही कागदपत्रे सुपूर्त करताना तीसुध्दा बंद लिफाफ्यातून दिली गेली होती आणि त्याबाबतची माहिती न्यायाधिशांव्यतिरिक्त कोणालाही मिळू नये अशीही दक्षता घेतली गेली होती आणि सर्वोच्च न्यायालयानेसुध्दा राष्ट्रीय सुरक्षिततेचे महत्त्व लक्षात घेऊन बंद लिफाफ्यातली माहिती स्वतःपुरती मर्यादित ठेवली आणि राफेल करारातल्या खरेदी किंमतीबाबत कोणतीही तडजोड झाली नसल्याचा निर्वाळाही दिला होता. म्हणजेच संरक्षण मंत्रालयाकडून सर्वोच्च न्यायालयांपर्यंत गेलेली कागदपत्रेसुध्दा अति गोपनीय राहिली होती. आता ज्यावेळी सर्वोच्च न्यायालयाची सुनावणी सुरू असताना पक्षकाराच्या वकिलांनी राफेल करारातल्या फाईलमधल्या नोंदी क्रमांकासह जेव्हा कोर्टाला सादर केल्या तेव्हा महाअधिवक्त्यांनी त्याला तीव्र आक्षेप घेतला आणि या नोंदी आणि फाईल क्रमांक पक्षकर्त्यांना कशा काय मिळाल्या. याचा अर्थ त्या चोरल्या गेल्या आहेत. या नोंदी मिळवणे किंवा सादर करणे गोपनीयतेच्या कायद्याचा भंग करणारा आहेत, अशी माहिती मिळवणाऱ्यांविरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचे खटले दाखल केले जातील. असे जेव्हा महाअधिवक्त्यांनी सांगितले त्यावेळी कडेकोट बंदोबस्तात असलेल्या या कागदपत्रांची माहिती बाहेर कशी गेली यावर पुन्हा नवे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### सरकारमधले गद्दार कोण?

सदर नोंदी किंवा क्रमांक अधिकाराखालीदेखील देता येऊ शकत नाही. अशावेळी जर कोणत्या मीडिया हाऊसला आणि पक्षकाराला मिळाली असेल तर गोपनीयतेच्या नियमाचा तो भंग असल्याचा युक्तिवाद महाअधिवक्त्यांनी जरी केला तरी अशा प्रकारे माहिती बाहेर जाणे हे सरकारचे अपयश ठरते. ज्या कोणाच्या माध्यमातून ही माहिती बाहेर गेली असेल त्याचा छडा लावला गेला पाहिजे. गोपनीयता ही देशाच्या सुरक्षिततेसाठी पाळली जाते मग त्या सुरक्षिततेचे महत्त्व केवळ सरकारने कोर्टात सांगण्यापुरते मर्यादित राहात नाही. ही गोपनीयता टिकवण्याची तितकीच मोठी जबाबदारी सरकारवर येते. पक्षकाराला ज्या माध्यमातून ही माहिती मिळाली त्यात त्याचे कौशल्य तर सिध्द होतेच. परंतु सरकारचा आणि त्यातही संरक्षण मंत्रालयाचा हलगर्जीपणाही त्यातून दिसून येतो. म्हणूनच फक्त माहिती मिळवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून काम भागणार नाही. तर ज्यांच्यामार्फत ही माहिती बाहेर गेली त्या सरकारमध्ये राहूनच गद्दारीचे काम करणाऱ्यांनाही शोधले गेले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयात राम जन्मभूमी प्रकरणातही निकाल दिला गेला आहे त्या गदारोळात राफेलसंदर्भातल्या या तितक्याच महत्त्वाच्या घटनेकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे.